# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## रस्ता सुरक्षा सप्ताह




राजगुरूनगर : रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती कार्यक्रमात बोलताना पिंपरीचे प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाटे.

# जेथे 'नियम' नसतात तेथे 'यम'- सचिन विधाटे

राजगुरूनगर, दि. १७ (प्रतिनिधी) - बलशाली भारताचे आधारस्तंभ असणाऱ्या तरुणांची संख्या रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये लक्षणीय व चिंतनीय असून सुरक्षित प्रवासासाठी रस्ता सुरक्षा नियमांचे प्रत्येकाने पालन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पिंपरी चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाटे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने ३१व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित जनजागृती कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे, सूरज वाडेकर, पंकज रोडे, चेतन पिंगळे उपस्थित होते.

विधाटे म्हणाले, रस्ते अपघात हे प्रामुख्याने मानवी चुकांमुळे होत असून जेथे 'नियम' नसतात तेथे 'यम' असल्याचे सांगितले. जगातील एकूण लोकसंख्येपेक्षा ग्रहताऱ्यांची संख्या अधिक असून ते कधीच आपली कक्षा, गती, नियम सोडत नसल्याने त्यांचा अपघात होत नाही; माणसाने यापासून बोध घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी तर डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.


प्रभात Sat, 18 January 2020
epaper.eprabhat.net/c/48076485

सकाळ

# सुरक्षित प्रवासासाठी वाहतुकीचे नियम पाळा : विधाटे

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती

राजगुरुनगर, ता. १९ : ''रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या लक्षणीय व चिंताजनक आहे. सुरक्षित प्रवासासाठी रस्ता सुरक्षा नियमांचे प्रत्येकाने पालन करण्याची गरज आहे,'' असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाटे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे, सूरज वाडेकर, पंकज रोडे, चेतन पिंगळे उपस्थित होते. विधाटे म्हणाले, ''वाहतुकीची चिन्हे, खुणा, रेषा, इशारे या माध्यमातून रस्ता बोलत असतो. त्याची भाषा वाहनचालकाने समजून घेणे गरजेचे आहे.'' प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी केले. डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.

### जेथे नियम नाही, तेथे यम...

रस्ते अपघात हे मानवी चुकांमुळे होतात. वाहतुकीचे नियम आपल्या जीवन-मरणाशी संबंधित आहेत. जेथे नियम नसतात, तेथे यम असतो. जगातील एकूण लोकसंख्येपेक्षा ग्रह, ताऱ्यांची संख्या अधिक आहे. मात्र ते कधीच आपली कक्षा, गती, नियम सोडत नसल्याने त्यांना अपघात होत नाही. माणसाने त्यांच्यापासून बोध घेण्याची गरज असल्याचे सचिन विधाटे यांनी सांगितले.



राजगुरुनगर (ता. खेड) : राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाअंतर्गत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाहतूक नियमांबाबत जनजागृती करणारे फलक दाखवताना मान्यवर.

Pune District Today
20/01/2020 Page No. 8

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती

राजगुरुनगर, (वार्ताहर) : हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने ३१ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पिंपरी चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाटे यांनी केले.




या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्रबंधक कैलास पाचारणे, पंकज रोडे, चेतन पिंगळे उपस्थित होते. रस्ते वाहतुकीची चिन्हे, रस्त्यावरील खुणा, रेषा, चिन्हे, इशारे, या माध्यमातून रस्ता बोलत असतो. त्याची भाषा वाहनचालकाने समजून घेण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. चित्रफितीच्या माध्यमातून मानवी चुकारस्ते अपघाताला कशा कारणीभूत ठरतात याचे गांभीर्य विद्यार्थ्यांच्या लक्षात त्यांनी आणून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉक्टर बी.डी. अनुसे यांनी केले.

दै. केसरी

लोकमत

# प्रवास करताना सुरक्षा नियमांची छत्री वापरा

## सचिन विधाटे : राजगुरुनगरमध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह; प्रामुख्याने मानवी चुकांमुळेच घडतात अनेक अपघात

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** रस्ते अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या लक्षणीय आहे. सुरक्षित प्रवासासाठी रस्ता सुरक्षा नियमांची छत्री प्रत्येकाने धारण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पिंपरी-चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाटे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह झाला. या वेळी जनजागृती कार्यक्रमात बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे, सुरज वाडेकर, पंकज रोडे, चेतन पिंगळे आदी या प्रसंगी उपस्थित होते. विधाटे म्हणाले की, 'रस्ते अपघात हे प्रामुख्याने मानवी चुकांमुळे होतात. जेथे नियम नसतात तेथे यम असतो. जगातील एकूण

लोकसंख्येपेक्षा ग्रह-ताऱ्यांची संख्या अधिक असून ते कधीच आपली कक्षा, गती, नियम सोडत नसल्याने त्यांचा अपघात होत नाही. माणसाने यापासून बोध घेण्याची गरज आहे. रस्ते वाहतुकीची चिन्हे, रस्त्यावरील खुणा, रेषा, चिन्हे, इशारे या माध्यमातून रस्ता बोलत असतो. रस्त्याची भाषा वाहनचालकाने समजून घेतली पाहिजे. निष्काळजीपणा टाळला तर निश्चितच अपघातांचे प्रमाण कमी होईल.'

वाहतुकीचे नियम हे आपल्या जीवन-मरणाशी संबंधित आहेत, वाहन चालवताना हेल्मेट व सीटबेल्ट नियमितपणे वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले. चित्रफितीच्या माध्यमातून मानवी चुका रस्ते अपघाताला कशा कारणीभूत ठरतात, याचे गांभीर्य विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉक्टर बी.डी. अनुसे यांनी, तर आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रमात प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाटे व इतर.

Hello Pune Gramin
Page No. 9 Jan 21, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख